www.ecourtsindia.com

सं. फौ. ख. क्र. ५३९/२०१९ निशाणी २३

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – नंदकिशोर सोनाजी बोर्डे

वय – २७ वर्षे, व्यवसाय – खाजगी नोकरी

पत्ता – शिंगोली, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. व्ही. इंगळे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. मी फिर्यादीला ओळखतो. ते माझ्या सोबत काम करतात. दि. २५.०४.२०१९ रोजी फिर्यादी यांना त्यांचे साडुभाऊ कैलास दांदळे यांच्या वाढदिवसासाठी जावयाचे होते. त्यांनी मला सांगितले की, त्यांच्या गाडीचा लाईट गेला आहे, त्यामुळे "तुझी गाडी दे.'' म्हणुन मी माझी हिरो होंडा डिलक्स मोटरसायकल क्र. एम.एच. ३० व्ही १२५७ फिर्यादीस दिली. मी त्यांना त्यांच्याकडे गावडीचा परवाना असलेबाबत विचारणा केली. त्यानंतर रात्री ०८.३०–०९.०० वाजता मला फिर्यादीचा फोन आला व म्हणाले की, त्यांचा आगर येथे अपघात झाला आहे. त्यानंतर मी, अरविंद देठे, संजय प्रधान आणि चंदन राठोड असे आम्ही ओझोन हॉस्पीटलला गेलो. त्या ठिकाणी गेलो असता आम्हाला रुपाली शाम बेंडे मृत झाल्याचे समजले. रुपाली बेंडे हया फिर्यादी शाम बेंडेंच्या पत्नी होत्या. त्यानंतर रुपाली बेंडे हिचे शवाला शवविच्छेदन करीता मेन हॉस्पीलटलमध्ये घेवुन गेले. आम्हाला समजले की, ट्रॅक्टर ट्रॉलीचा धक्का रुपाली बेंडेला लागला त्यामुळे ती मोटरसायकलवरुन खाली पडली आणि ट्रॉलीचे चाक तिचे पोटावरुन गेले. ट्रॅक्टर चा क्र. एम.एच. ३० ए.बी. ९२३६ असा होता व ट्रॉली क्र. एम.एच. ३० ए.एन. ४०५९ असा होता. ट्रॅक्टर हा भरधाव वेगात होता असे मेन हॉस्पीटलला गेल्यानंतर फिर्यादीकडुन समजले. मी आरोपीला यापुर्वी पाहिले नव्हते. मी आजरोजी न्यायालयात पहिल्यांदा पाहिले.

सरतपास पूर्ण.

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAK070012592019-orderno-2.pdf

www.ecourtsindia.com

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.पी.एस.तिडके यांच्या मार्फत–</u>**

२. फिर्यादी माझे मित्र आहेत. आम्ही ४ वर्षापासुन सोबत काम करतो. माझे बयान दि. २५.०४.२०१९ रोजी नोंदविले. माझे बयान एकच वेळा नोंदविले. माझे बयानात मी ट्रॅक्टर चे चाक मृतकाच्या पोटावरुन गेल्याचे सांगितले नव्हते. मी प्रत्यक्ष मोक्यावर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबद्दल कोणतीही माहिती नाही. माझे बयानात मला फोन आल्यानंतर ओझोन हॅास्पीटलला गेल्याची बाब मी सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.03.10 11:00:20 +0530

बाळापूर. (श्रीमती डी. एम. पाटील)
दि.०७/०३/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAK070012592019-orderno-2.pdf